# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - गाणं गाण्यातलं
- कवी / कवयित्रीचे नाव :- श्रीमती रचना रामदास रेडकर

---

संगीतातील वाद्यांची
भरली होती सभा
एकमेका साथ द्यायला
तयार असतात सदा

ओळख करून देत होते
प्रत्येक जण आपली
कोणी मागे राहिले नाहीत
सांगायला मोठेपणा आपला

सतार, सरोद, सारंगी
बोटाने करतात जादू
सूर देवून गाण्यात
रंगत आणतात लय भारी

सुर ताल, लय भाव धरता ठेका
सर्व कसे हवे प्रमाणात याचा धरतात हेका
नसेल तबला, पेटी, झांज, बासरी
त्यांची नेहमीच उणीव गाणे गाताना सारी

सारे माझेच मित्र
ध्वनी, नाद निर्माण करतात
रंगत आणून गाण्यात
मैफिलीत रंग भरतात

Arihant Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

गाणे असू दे साध
ही चढत्या चालीचे
शब्द, सुर, ताल, लय
महत्त्व साऱ्यांना द्यायचे

संगीत हीच खरी आहे एक जादू
आजारी विसरतो आजार पणा
ध्वनी स्नान, ध्वनी ध्यान करून
तल्लीन होऊन जातात टेन्शन विसरून

जेथे औषधाचा इलाज न चाले
तेथे संगीत हातात हात घाले
अशी आहे एक म्हण
दवा के साथ दुवा की जरूरत है
तर आता आपण म्हणूया
दवा के साथ संगीत भी जरुरी है

वनस्पती, प्राणी पण देतात
संगीताला प्रतिसाद
लक्षपूर्वक संगीत ऐकण्याला
तुम्ही पण करा सुरुवात

कलेची कराल जोपासना
हीच ठरेल देवाची उपासना
कलावंताला जर द्याल दाद
निरंतर राहील कला आबाद

गाणे जुने असो नवे
त्यातील संगीत हेच खरे
जो संगीताशी कायम जुळला
जीवनाचा आस्वाद घ्याल सगळा

Anahat Music Therapy

## ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

देश भारत असो वा विदेश
कार्यक्रम म्हटला की संगीत
संस्कृतीचा वारसा परंपरा
जपुया आपण सगळेच

लय सूर ताल ठेका सारी
संगीतातलीच बंधू भगिनी
एक कमी पडला तर
दुसरा सांभाळून घेई

तर कधी होते यांची जुगलबंदी
शुद्ध, कोमल, निषाद स्वर
राग, बंदिश यांचीच संगीतात लय लूट
साऱ्यांनीच नाळ संगीताशी जुळवा
संगीतमय जीवन नक्कीच फुलवा

Anahat Music Therapy